अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

# मुंडे यांच्यानंतर भाजपापुढे निर्माण झालेले प्रश्न

राजकारणामध्ये विशेष कर्तृत्व गाजवलेली व्यक्ती ज्यावेळी अचानकपणे निघून जाते त्यावेळी ती पोकळी भरून निघायला बराच कालावधी लागतो. महाराष्ट्रात गोपीनाथ मुंडे यांच्या अचानक निधनानंतर भारतीय जनता पार्टीमध्ये अशीच पोकळी निर्माण झाली आहे. मुंडे यांचा लोकनेता म्हणून असलेला दरारा आणि त्याचवेळी पक्षातील राज्यपातळीवरचा एक वरिष्ठ नेता म्हणून त्यांनी स्वत:चे स्थान निर्माण केले होते. मुंडे यांचे सर्व राजकीय पक्षाच्या नेत्यांशी असलेले संबंध याशिवाय एकूण त्यांच्या राजकारणाचा आवाका या सगळ्या गोष्टी लक्षात घेतल्या तर त्या ताकदीचा नेता आज तरी भारतीय जनता पार्टीमध्ये नाही. मुंडे यांच्या खालोखाल नितीन गडकरी यांच्याकडे आता प्रदेश भाजपाचे वरिष्ठ नेते म्हणून पाहिले जाईल. परंतु गोपीनाथ मुंडे यांच्यासारखा बहुजन समाजाचा पाठिंबा असलेला नेता म्हणून गडकरी यांची प्रतिमा पुढे येत नाही. ते कधीही विधानसभेवर निवडून गेलेले नाहीत. आता पहिल्यांदाच त्यांनी लोकसभा निवडणुकीच्या निमित्ताने निवडणूक लढवली. आणि नरेंद्र मोदींच्या लाटेमुळे ते निवडूनही आले. परंतु खेड्यापाड्यातल्या भारतीय जनता पार्टीची नावानिशी जी माहिती गोपीनाथ मुंडे यांना माहीती होती ती गडकरी यांना नाही. अगदी या पक्षाच्या कार्यालयातसुध्दा मुंडे यांना भेटायला येणारी लोकांची गर्दी आणि गडकरी यांना भेटायला येणाऱ्यांची गर्दी याच्यातही फरक दिसून येतो. किंबहुना बऱ्याचवेळेला तर मुंडे हे सतत कार्यकर्त्यांच्या गराड्यात राहात असल्याचे दिसून येते. राज्य पातळीवरील राजकारणाचे अनेक डावपेच माहिती असणारे आणि त्यासाठी आपल्या सगळ्या संबंधांचा आणि संपर्काचा पक्षासाठी वापर करण्याची तयारी असणारे मुंडे हे वेगळे रसायन होते. आता त्यांच्या निघून जाण्यामुळे त्यांच्या ताकदीचा नेता प्रदेश भाजपामध्ये नाही आणि ही पोकळी येत्या विधानसभा निवडणुकीपर्यंतही पूर्णपणे भरून निघेल अशी शक्यताही दिसत नाही. अर्थात आज ही परिस्थिती असली तरी त्या दिशेने भाजपाला प्रयत्न करावे लागतील. विशेषत: आगामी विधानसभा निवडणुका लक्षात घेऊन यासाठी भारतीय जनता पार्टीच्या प्रदेश स्तरावरील सर्वच नेत्यांना अधिक जबाबदारीने आणि अधिक काळजीपूर्वक प्रयत्न करावे लागणार आहेत.

### भाजपामध्ये पोकळी

खरे सांगायचे तर विधानसभा निवडणुकीच्या तयारीसाठी पक्षाकडे फारसा वेळच उपलब्ध नाही. एकीकडे नरेंद्र मोदी यांचे सरकार बहुमत मिळवून केंद्रात निवडून आले. त्यांनी सुरू केलेल्या कामाच्या नव्या पध्दतीमुळे लोकांच्याही मनात विश्वास निमिर्ण होत आहे. लोकसभा निवडणुकीप्रमाणेच विधानसभा निवडणुकीतही भाजपा शिवसेना महायुतीला बऱ्यापैकी अनुकूल परिस्थिती दिसत आहे. मोदी यांची गाठ केवळ लोकसभा निवडणुकीपुरती होती असे समजण्याचे कारण नाही. त्यांचा प्रभाव येत्या वर्षभरापर्यंत राहू शकतो.आणि महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीसाठी त्याचा भरपूर लाभ महायुतीला उठवता येऊ शकतो. यासाठी सर्व प्रकारची सूत्रे तितक्याच व्यवस्थितपणे हाताळणाऱ्या नेत्यांची भाजपाला गरज भासेल. नितीन गडकरी यांना तर यासाठी विशेष भूमिका पार तर पाडावी लागणार आहेच. मात्र त्याबरोबर राज्याच्या प्रदेश कार्यकारिणीतल्या काही नेत्यांनाही आपोआपच काही जबाबदारी स्वीकारावी लागेल. सध्या प्रदेशाध्यक्ष असलेले देवेंद्र फडणवीस, विधानसभेतील विरोधी पक्ष नेते, विधानपरिषदेतील विनोद तावडे तसेच पांडुरंग फुंडकर यासारख्या नेत्यांना देखील अधिक लक्ष घालून पक्षाची मोट शाबूत ठेवावी लागेल. कारण निवडणुकीच्या प्रत्यक्ष तयारीला सुरुवात करण्यापूर्वी नेतृत्वाची एक फळी उभी करणे गरजेचे आहे. आतापर्यंत प्रमोद महाजन यांच्यानंतर गोपीनाथ मुंडे पक्षाचा कारभार एकहाती सांभाळून घेत असत. आपली पक्षावरची पकड सैल होणार नाही याची त्यांनी नेहमीच दक्षता घेतली होती आणि म्हणूनच केंद्रीय पातळीवरसुध्दा मुंडेंकडे लोकसभेतील उपविरोधी पक्षनेत्याची जबाबदारी दिली गेली. एवढेच नव्हे तर केंद्रीय मंत्रिपद दिल्यानंतरही विधानसभेची निवडणूक त्यांच्या नेतृत्वाखालीच लढण्याचे पक्षाच्या राष्ट्रीय पातळीवरच्या नेत्यांना वाटत होते. राज्यात महायुतीचा प्रयोग यशस्वीपणे राबवण्यामध्ये गोपीनाथ मुंडे यांचा बराच मोठा वाटा होता. तीच महायुती आता विधानसभा निवडणुकीतही काँग्रेसला मोठे आव्हान देऊ शकते. सगळ्या पक्षाच्या नेत्यांना सांभाळून घेण्याचे कौशल्य मुंडे यांना जमू शकले. आता त्यांच्या अनुपस्थितीत हे तितक्याच जोखमीचे किंवा नाजूक काम अन्य कोणाला कितपत जमेल याबद्दल शंकाच वाटते.

### समन्वयाची भूमिका आवश्यक

स्वाभाविकपणे मुंडे यांच्या या अचानक निघून जाण्यामुळे निश्चितच काही प्रश्न निर्माण झाले आहेत. ज्याची उत्तरे शोधताना भारतीय जनता पार्टीच्या प्रदेश किंवा अगदी राष्ट्रीय पातळीवरच्या नेत्यांचीसुध्दा बऱ्यापैकी कसोटी लागेल. प्रामुख्याने तातडीने भेडसावणाऱ्या प्रश्नांचा विचार केला तर पक्षाची विजयासाठी जय्यत तयारी करणे, राज्यात सत्ता येण्याची शक्यता असल्यामुळे अधिकाधिक चांगल्या उमेदवारांचा शोध घेणे व तो घेत असताना सगळ्याच प्रादेशिक किंवा अन्य अस्मितांचा विचार करावा लागेल. यातला तितकाच नाजूक प्रश्न म्हणजे महायुतीमध्ये भाजपाचा प्रभाव टिकवून जागा वाटपांचा तिढा सोडवणे हा आणखीनच परीक्षा पाहणारा मुद्दा ठरणार आहे. यावेळी भाजपाला २८८ जागांपैकी निम्म्या जागा लढवायच्या आहेत. यासंदर्भातली बोलणी तितक्याच कौशल्याने उध्दव ठाकरे यांच्याबरोबर भारतीय जनता पार्टीला करावी लागणार आहे. राज्यातसुद्धा सगळ्या पक्षाच्या नेत्यांशी चर्चा करून जागा वाटपातला सुवर्णमध्य शोधावा लागणार आहे. कारण हाच मुद्दा अधिक संघर्षाचा ठरू शकतो. सत्ता येण्याची चिन्हे असल्यामुळे तिकिटे मागणाऱ्यांची संख्या जास्त असू शकते. शिवसेनेबरोबर जागा वाटपांचे आतापर्यंत असणारे समीकरण तसेच्यातसे कायम राहणार नसले तरी शिवसेना त्याबाबत तितकेच आग्रही राहण्याची शक्यता आहे, अशावेळी सर्वच पक्षांच्या नेत्यांशी बोलताना समन्वयाची भूमिका घेण्याचे काम गडकरी, फडणवीस, तावडे आणि खडसे यांना घ्यावी लागेल. एकीकडे निवडणुकीतील विजय समोर दिसत असताना तितकाच कसोटीचा काळ भाजपापुढे ठाकलेला आहे. पुढच्या भविष्यकाळाचा विचार केला तर आज पक्षाकडे मुंडेंसारखा लोकनेता नाही. परंतु मुंडेंप्रमाणे समाजाच्या सगळ्या वर्गाचे प्रतिनिधीत्व करणारा किंवा सामान्य कार्यकर्त्याला आपलासा वाटणारा नेता भाजपाला निर्माण करावा लागणार आहे.